**<u>नि.फौ.ख.क्रं. १५२/२०२१</u>** **<u>निशाणी क्र. ३५</u>**
**<u>शासन .वि. पंढरी दुधकोहळे व इतर</u>**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०४ ची शपथेवर जबानी**

.......

**माझे नांव** – खुशाल शंकरराव हळदे
**वय** – २८ वर्षे, धंदा – ड्रायव्हर,
**राहणार** – जुवाळी, तालुका–सेलू, जि. वर्धा.

.......

**<u>सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत</u>**

१. दि.०४/०२/२०२१ रोजी पोलीसांनी मला पंचनामा करण्यासाठी जुवाळी येथे बोलविले होते. पोलीसांनी माझ्या समक्ष काडी जप्त केली होती. सदरची काडी बादल दुधकोहळे यांच्या कडुन जप्त केली होती. त्यावेळी माझ्या सोबत दुसरे पंच गौरव पोतीरवार हजर होते. त्यानंतर पोलीसांनी माझ्या समक्ष पंचनामा केला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.३६</u>** देण्यात येते. आता मला सदरची काडी दाखविण्यात आली. ती तीच असुन त्यास **<u>आर्टिकल–अ</u>** देण्यात येते. ज्या आरोपीने काडी दिली होती तो आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ आर.आर.राठी यांच्या मार्फत :</u>**

२. घटनेच्या किती दिवसानंतर पोलीसांनी मला बोलविले होते ते मला माहित नाही. मी आरोपींना घटनेच्या पुर्वीपासुन ओळखतो. पोलीसांनी मला पंचनामाच्या वेळी समन्स दिला नव्हता. मी कार्यवाहीसाठी पोलीसांसोबत गावाच्या बाहेरील जिनिंग समोर गेलो होतो. जिनिंग व आरोपींच्या घरामध्ये दोन किलोमिटरचा अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी दहा वर्षेपासुन सेलू येथे राहतो. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, माझे गावी जाणे येणे असते. ज्या कागदावर मी सही केली त्या कागदावर पोलीस व आम्ही दोन पंच या व्यतिरिक्त कोणाची सही होती याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदरची काडी कुठुन

आणली याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याचा कार्यवाही नंतर मी पोलीस स्टेशनला गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, काडीवर वरील बँडेज आज रोजी मी पहिल्यांदा पाहत आहे. हे म्हणणे खरे नाही की, काडी माझ्या समोर जप्त केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचे व माझे पटत नसल्यामुळे मी त्यांच्या विरुद्ध आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष कोणत्याही पंचनामा करण्यात आला नाही.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2025.12.10 17:45:23 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**दिनांक** : १०/१२/२०२५